RCC No.105/2020
CNR No.MHPU160004532020

**(In Camera)**

**नि.क्र. १५**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ यांची साक्ष</u>**

मी सत्य प्रतिज्ञेवर साक्ष देते की,

नाव : सुवर्णा संजय आटोळे
वय : ३१ वर्षे, धंदा : घरकाम
राहणार : गाडीखेल, ता.बारामती, जि. पुणे

**<u>सरकारतर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी वकील श्री. ए.पी. लोहकरे यांचे मार्फत :-</u>**

**१.** घटना दि.०३.१०.२०१९ रोजी आमच्या घराच्या शेजारी असलेल्या पोल्ट्री शेडजवळ घडली होती. आमच्याकडे त्यावेळी साधारणतः ३,००० हजार ते ४,००० हजार कोंबडया होत्या. त्या सदरच्या कोंबडया बारामती ॲग्रो कंपनीतर्फे घेण्यात आल्या होत्या व त्यावर देखरेख करण्यासाठी कंपनीचे डॉ.हनंमुत निवृत्ती शिंदे हे नेमलेले होते व ते अशक्त व मेलेल्या कोंबडयांची पाहणी करण्यासाठी येत असत. ते कंपनीला त्या कोंबडयाबाबत फोटो काढुन कळवत होते. त्या दिवशी ३.०० ते ४.०० वाजेच्या सुमारास मी आमच्या कुक्कुटपालनाच्या शेडवर आले होते. त्यावेळी आरोपी त्या ठिकाणी आला. त्याने मला घरी कोणी आहे का अशी विचारणा केली. त्यावेळी घरी कोणी नसल्याने मी त्यांना घरी कोणी नाही बाहेर गेले आहेत असे सांगितले. त्याने माझा हात धरला व "तु मला आवडतेस, तु माझ्यासोबत मैत्री करतेस का" असे म्हणुन पोत्यांच्या थापीच्या आडोशाला घेवुन माझ्यासोबत झोंबाझोंबी केली. मी आरोपीच्या तावडीतुन सुटका करुन माझ्या पतीस सांगेल असे म्हणाले. त्याने मला जर कोणाला सांगितले तर तुला मी मारुन टाकेल अशी धमकी दिली. त्यानंतर आरोपी त्या ठिकाणाहुन पळुन गेला.

**२.** त्यानंतर माझे पती आल्यावर मी त्यांना घडलेला सर्व प्रकार सांगितला.

त्यानंतर मी पोलीस ठाण्यात आरोपी विरुध्द तक्रार करण्यासाठी गेली. आता मला मी आरोपी विरुध्द दिलेली तक्रार दाखविण्यात आली. त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादला **नि.१६** देण्यात येते.

**३.** दुस-या दिवशी दि.०४.१०.२०१९ रोजी पोलीस पोल्ट्री फार्मवर आले होते. पोलीसांनी पोल्ट्री फार्मवर विचारपुस केली व घटना ठिकाणचा पंचनामा केला. त्यावेळी पंच म्हणुन दोन माणसे होती त्यांचे नाव शेंडे आणि आवधे असे होते. ते पोलीस साधारणतः १०.०० वाजता आले होते आणि १०.३५ ला पंचनामा करुन निघाले. त्यानंतर दि.०७.१०.२०१९ रोजी मला न्यायालयात बोलविण्यात आले. मला त्या ठिकाणी न्यायाधिशांनी काही प्रश्न विचारले व माझा जबाब नोंदविला होता.

**४.** ( मा. न्यायालयाने नोंदविलेला फिर्यादीचा जबाब सिलबंद लखोटयात असुन सदर लखोटा आरोपीचे विधीज्ञ तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या उपस्थित उघडविण्यात आला. त्यात फिर्यादीने दिलेल्या जबाबाची प्रत आहे.) साक्षीदारास आता न्यायालयाने दि.०७.१०.२०१९ रोजी फौ.प्र.सं.कलम १६४ अन्वये नोंदविलेल्या जबाबाची प्रत दाखविण्यात आली. त्यावर असलेली तिची स्वाक्षरी तिने ओळखली असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केल्याने सदर जबाबास **नि.१७** देण्यात येते. मी आरोपीला ओळखते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री .एस.बी.सोनटक्के यांचेमार्फत सुरुः-**

**५.** माझे शिक्षण इयत्ता १० पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोल्ट्रीचा व्यवसाय मी व माझे पती असे दोघजण बघत होतो. आमच्या घरात

त्यावेळी ६ लोकं राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही बारामती ॲगो कंपनी मार्फत पक्षी घ्यायचो. हे म्हणणे खरे आहे की, बारामती ॲग्रो पक्षांना लागणारे खाद्य देखील पुरवत होते. हे म्हणणे खरे आहे की, बारामती ॲग्रो तर्फे पुरवण्यात येण-या खाद्य पदार्थाचा डाटा ऑनलाईन सेव्ह व्हायचा. आरोपी आमच्या पोल्ट्री फॉर्मला दोन-तीन महिन्यापासुन भेट देत होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्याकडे जास्त पक्षी असल्याने त्यांना सांभाळण्यासाठी कामगारांची आवश्यकता असते. हे म्हणणे खरे आहे की, कंपनीने पुरवलेल्या खाद्यातुन जे खाद्य शिल्लक राहत असे त्याचा तपशील आम्हाला कंपनीला पुरवावा लागत होता. हे म्हणणे खरे आहे की, शिल्लक राहिलेले खाद्य हे दुस-या पोल्ट्री फॉर्मवर पुरविले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, पक्षी अशक्त असले किंवा मयत झाले त्याचा तपशील देखील कपंनीला दयावा लागायचा. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराजवळुन गाडीखेल रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा रस्ता वर्दळीचा आहे.

**६.** हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पोल्ट्री फार्म शेजारी लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळी माझे पती बाहेर गावी गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, पक्षांना हवा लागण्यासाठी जाळी असते. साक्षीदार सांगते की, कागद पण असतो.

**प्रश्नः** घटनेच्यावेळी पशु खादयाची पाच ते सहा पोती होती ?

**उत्तरः** नाही, जास्त होती.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, घटना ठिकाणच्या आजुबाजूला शेती आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी शेतात काम करणारे मजुर देखील होते. घटनेच्या दिवशी माझे पती कोणत्या गावाला गेले होते ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पोल्ट्री फार्मला पुरवण्यात आलेले पक्षी कंपनीचे असल्याने कंपनीचे पशु खाद्य घेणे बंधनकारक होते. हे म्हणणे खरे आहे की, पक्षांना खाद्य

खाउ घातल्यास त्यांचे वजन वाढते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बाहेरुन खाद्य आणत होतो. हे म्हणणे खरे नाही की, कंपनीने आम्हाला दुसरी पोल्ट्री देवु केली होती. हे म्हणणे खरे नाही की, देवु केलेली पोल्ट्री लांब अंतरावर होती. माझ्या फिर्याद जबाबात मी घटनेबाबत माझ्या पतीला फोन करुन सांगितले हे जे काही लिहिले आहे ते तसे का लिहिले आहे याचे कारण मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझ्या सांगितल्याप्रमाणे जबाब लिहिला होता. मी जबाब वाचुन त्यावर सही केली होती.

**८.** हे म्हणणे खरे आहे की, माझे पती साधारणतः ७ ते ८ वाजता घरी आले. मी त्यांना झालेला प्रकार सांगितला. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला चर्चा करण्यामध्ये साधारणतः १ तास वेळ गेला. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशन ते गाडीखेल यांच्यातील अंतर साधारणतः अर्धा ते पाउण तासाचे आहे.

**प्रश्नः** पोलीस ठाण्यात गेल्यानंतर पोलीसांना माहिती सांगण्यात तुमचा साधारणतः अर्धा-एक तास गेला असेल ?

**उत्तरः** १० ते १५ मिनीटे लागली होती.

**९.** हे म्हणणे खरे आहे की, माझे पती घरी आल्यावर आम्ही दोघांनी विचारविनीमय करुन फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, संजय बाळु आटोळे हे माझे पती आहेत. निलेश अवधे हे आमच्या गावातील आहेत. ते माझ्या पतीचे चांगल्या परिचयाचे असल्या विषयी मला सांगता येणार नाही. तसेच, दत्तु शेंडे हे देखील माझ्या पतीचे चांगल्या परिचयाचे असल्या विषयी मी सांगु शकत नाही.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही बाहेरुन पशुखाद्य आणत व ते बारामती ॲगोच्या बिलामध्ये सामील करा असे आरोपीस सांगत होतो. हे म्हणणे खरे नाही की, पक्षी अशक्त व मयत झाल्याचा रिपोर्ट आरोपी बारामती ॲग्रोला करीत

असल्याचे  आम्हाला आरोपी विषयी राग होता.  हे म्हणणे खरे आहे की, पोलीस आमच्याकडे एकदाच आले होते.  हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणत्याही घटनास्थळाचा पंचनामा झालेला नाही.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्यासोबत कोणतेही कृत्य केलेले नाही.   हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझा हात धरला व तु मला आवडतेस, तु माझ्यासोबत मैत्री करतेस का" असे म्हणुन पोत्यांच्या थापीच्या आडोशाला घेवुन माझ्यासोबत झोंबाझोंबी केली असे काही घडले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा सागितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

दिनांक : ०६/०८/२०२६

(अमोल पां.मराठे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
बारामती